| MHSO200020692018 | **नियमित दिवाणी दावा क्र. ३९१/२०१८** |
|---|---|

## निशाण क्र. ५५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव यांना मूळ कागदपत्रे दाखल करणेबाबत तसेच त्याअनुषंगाने साक्ष देण्याबाबत त्यांना साक्षीसमन्स काढण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदरचा दावा वादींनी जाहीर ठराव होऊन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असून वादमिळकत ही घरजागा असल्याने ग्रामपंचायत मौजे डोंगरगाव येथील ग्रामपंचायत यांच्या दप्तरी सदर घरजागेच्या नोंदी, सन २०११ ते २०२१ पर्यंतच्या कर भरल्याबाबतच्या पावत्या ई. मूळ कागदपत्रे वादींतर्फे पुराव्याकामी तपासणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामूळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव यांना दाव्याच्या कामी मूळ कागदपत्रे घेऊन साक्ष देणेकामी हजर राहणेबाबत साक्षीसमन्स काढणे आवश्यक आहे. सबब, त्यांना अर्जात नमूद कागदपत्रे घेऊन जाबजबाब देण्यासाठी साक्षीसमन्स काढण्यासंदर्भात आदेश व्हावा ही अशी त्यांनी विनंती केली असून ते साक्षभत्ता भरण्यास तयार आहेत.

३. सदर अर्जावर प्रतिवादींतर्फे म्हणणे देवून त्यांनी असे कथन केले की, वादीचा अर्ज कायदेशीर नसून अर्जात तरतुद नमूद केलेली नाही. तसेच संबंधीत साक्षीदार वादविषयाशी संबंधीत नसून सदर सरकारी कर्मचाऱ्यास साक्षीकरीता बोलवण्यासाठी काणतेही कारण अर्जात

नमूद केलेले नाही. वादी यांनी अर्जात नमूद केलेली कागदपत्रे हे पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्याकरीता साक्षीसमन्स काढता येणार नाही. वादींनी दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने सदरचा बेकायदेशीर अर्ज दाखल केलेला आहे. सबब, वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा वादींनी जाहीर ठराव होऊन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींनी सदर अर्जामध्ये वादमिळकत ही घरजागा असल्याने ग्रामपंचायत मौजे डोंगरगाव येथील ग्रामपंचायत यांच्या दप्तरी सदर घरजागेच्या नोंदी, सन २०११ ते २०२१ पर्यंतच्या कर भरल्याबाबतच्या पावत्या ई. मूळ कागदपत्रे वादींतर्फे पुराव्याकामी तपासणे आवश्यक असल्याने ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव यांना दाव्याच्या कामी मूळ कागदपत्रे घेऊन साक्ष देणेकामी हजर राहणेबाबत साक्षीसमन्स काढणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. परंतु, वादी प्रस्तुत अर्जाद्वारे ज्या कागदपत्रांसाठी साक्षीसमन्सची मागणी करत आहेत ती कागदपत्रे ही संबंधीत कार्यालयामध्ये अधिकृतपणे ठेवली जातात त्यामूळे सदर कागदपत्रांचा स्वरुप हे सार्वजनिक असल्याचे निदर्शनास येते. त्यामूळे, सदर कागदपत्रे वादींना संबंधीत कार्यालयाकडून योग्य प्रक्रिया राबवून प्राप्त करता येऊ शकतात. त्याव्यतीरीक्त वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये मूळ कागदपत्रे सोबत आणून साक्ष देणेबाबत ग्रामसेवकास समन्स काढण्यासाठी इतर कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. अशा परीस्थीतीत अर्जातील नमूद कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सामान्य पध्दतीनुसार प्राप्त केली जाऊ शकतात तसेच भारतीय पुरावा कायद्यानुसार प्रमाणित प्रतींच्या खरेपणाबद्दल गृहीतकाची तरतुद आहे त्यामूळे अर्जात नमूद केलेल्या कारणासाठी ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव यांना सदर कागदपत्रे घेऊन साक्षीदार म्हणून बोलावल्याने अनावश्यक विलंब होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. वादींचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादींवर ठेवण्यात येत आहे.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE

Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.12.08 16:57:54 +0530

दिनांक – ०८/१२/२०२५.

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०८/१२/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ०८/१२/२०२५ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०९/१२/२०२५ |